देशोन्नती दि 2.8.25

# नांदेड परिक्षेत्रात पोलिसांनी केलेल्या कारवाईत १२ कोटींचा मुद्देमाल जप्त

## नांदेड जिल्ह्यात ६०१ कारवाया; ६.६९ कोटींचा मुद्देमाल जप्त



नांदेड पोलिसांनी हातभट्टी दारू व्यवसायाशी निगडीत एका इसमास एमपीडीए कायद्यानुसार एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार केले असून १७ जुलै रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात केली आहे.

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुरू केलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियान-३ अंतर्गत नांदेड परिक्षेत्रात राबविलेल्या मोहिमेत २०३९ केसेस करून १२ कोटी ३० लाख ९५ हजार २३४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून २५११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यात ६०१ कारवाया करून ६ कोटी ६९ लाख ९५ हजार ४८१ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, मटका, जुगार, रेती उपसा यासारख्या व्यवसायावर बंदी घालण्यासाठी अवैध व्यवसायाविरुद्ध अभियान सुरू केले आहे. त्यानुसार जुलै महिन्यात राबविण्यात आलेल्या अभियान ३ अंतर्गत नांदेड जिल्ह्यात ६०१ केसेस करून ६ कोटी ६९ लाख ९५ हजार ४८१ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून ८०२ आरोपींविरुद्ध गुन्हा करण्यात आला आहे. तसेच हिंगोली, परभणी व लातूर जिल्ह्यासह परिक्षेत्रात २०३९ केसेस करून २५११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून १२ कोटी ३० लाख ९५ हजार २३४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.